RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३२] शुक्रवार, ऑगस्ट २१, २०१५/श्रावण ३०, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ५०

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-३ |

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट २०१५.

MAHARASHTRA ORDINANCE No. XVI OF 2015.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

२०१५ चा महा. अध्या. १४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१५ हा, दिनांक १६ जून २०१५ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १३ जुलै २०१५ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१५ (सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक १४ जुलै २०१५ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक ३१ जुलै २०१५ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांनंतर म्हणजेच २३ ऑगस्ट २०१५ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश अंमलात राहणार नाही ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ; आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १६ जून २०१५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

१९६४ चा महा. २०.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१ब) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क)(अ) राज्य शासनास, राजपत्रातील आदेशाद्वारे,—

(एक) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील ; आणि

(दोन) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील,

ज्या, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती असतील.

(ब) खंड (अ) अन्वये नियुक्त केलेल्या विशेष निमंत्रितांना बाजार समितीच्या चर्चांमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु तिच्या सभेमध्ये मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(क) विशेष निमंत्रितांचा पदावधी हा, बाजार समितीच्या सदस्यांच्या पदावधी इतकाच असेल.".

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ मागे घेऊन त्याचे निरसन व व्यावृत्ती.

२०१५ चा महा. अध्या. १४.

**३.** (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१५ हा, याद्वारे, मागे घेण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे अध्यादेश मागे घेण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश किंवा केलेली कोणतीही नियुक्ती यांसह) ही, या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## निवेदन.

बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विविक्षित उत्पन्नाच्या पणनचा आणि त्यासाठी राज्यात करलेल्या बाजारांचा तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा विकास व विनियमन करणे, अशा बाजारांच्या संबंधात स्थापन करावयाच्या किंवा बाजारांशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे, याकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) हा अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाखाली घटित केलेल्या बाजार समित्यांचे कार्य अधिकाधिक कार्यक्षमतेने व सुरळीतपणे चालावे याची सुनिश्चिती करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांमधील तज्ज्ञ व्यक्तींची बाजार समित्यांवर विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करणे इष्ट वाटले होते, जेणेकरून बाजार समित्यांना अशा तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. तसेच, अशा विशेष निमंत्रितांना, बाजार समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु त्यांना त्यात मतदान करण्याचा हक्क असणार नाही अशीही तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते. त्या प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ मध्ये एक नवीन पोट-कलम (१क) समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती. आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक १६ जून २०१५ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१५ (२०१५ चा महा. अध्या. १४) प्रख्यापित केला होता.

४. त्यानंतर, दिनांक १३ जुलै २०१५ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१५ (सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक १४ जुलै २०१५ रोजी संमत केले होते आणि त्यानंतर ते महाराष्ट्र विधानपरिषदेकडे पारेषित करण्यात आले होते. तथापि, त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक ३१ जुलै २०१५ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही.

५. राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांनंतर म्हणजेच २३ ऑगस्ट २०१५ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद होईल. म्हणून, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी नवीन अध्यादेश प्रख्यापित करून तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनासाठी, सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याच्या तरतुदी अंमलात असण्याचे पुढे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

चे. विद्यासागर राव,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २० ऑगस्ट २०१५.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिनेश कुमार जैन,
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.